वर्ष : ०४ | अंक: ५१ | मुंबई, मंगळवार १३ नोव्हेंबर २०१८ ते १९ नोव्हेंबर २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in


# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 वीज ग्राहकांना दरवाढीचा धक्का

3 → बरबादीची दोन वर्षे

आता निवडणूक नाही : शरद पवार ← 4




# पुन्हा उडणार पेट्रोल-डिझेल दराचा भडका?



**नवी दिल्ली: गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल, डिझेलच्या दरात सतत घट होत आहे. मात्र लवकरच इंधन दर पुन्हा भडकण्याची शक्यता आहे. तेल निर्यातदार देश उत्पादन कमी करण्याच्या विचारात आहेत. त्यामुळे लवकरच इंधनाचे दर वाढू शकतात. आज सकाळी आंतरराष्ट्रीय बाजारातील उलाढाल सुरू होताच ब्रेंट क्रूड ऑईलचा प्रति बॅरल दर ७०.६९ डॉलर इतका होता. शुक्रवारी हाच दर ७० डॉलरच्या खाली होता. आज दुपारी एक वाजता खनिज तेलाचा दर ७१.६१ डॉलर इतका होता. ही आकडेवारी पाहिल्यास येत्या काही दिवसात इंधन दरात वाढ होऊ शकते.**

अमेरिकेनं इराणवर निर्बंध लादल्यानं इंधन दरात मोठी वाढ होईल, अशी शक्यता होती. इराणशी व्यापारी संबंध कायम ठेवणाऱ्या देशांवर अमेरिका बहिष्कार टाकेल, अशी भूमिका डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतली होती. मात्र यामधून अमेरिकेनं भारत, चीन, जपानसह आठ देशांना वगळलं. याशिवाय अमेरिका, सौदी अरेबिया आणि रशियानं खनिज तेलाचं उत्पादन वाढवलं. त्यामुळे जवळपास वीस दिवस पेट्रोल, डिझेलचे दर घटले. एप्रिलनंतर पहिल्यांदाच शुक्रवारी खनिज तेल ७० डॉलर प्रति बॅरलच्या खाली गेलं होतं. मात्र हा दिलासा फार काळ राहण्याची शक्यता कमीच आहे.

जागतिक बाजारात इंधनाच्या किमती सतत कमी होत आहेत. यामुळे तेल आयातदार देशांना दिलासा मिळाला आहे. मात्र यामुळे तेल निर्यातदार देशांच्या महसुलात घट झाली आहे. त्यामुळेच सौदी अरेबियाकडून खनिज तेलाचं उत्पादन कमी करण्याचा विचार सुरू आहे. विशेष म्हणजे गेल्याच महिन्याच सौदीनं तेल उत्पादन वाढवण्याचं आश्वासन दिलं होतं. तेलाचं उत्पादन कमी करण्याबद्दल चर्चा करण्यासाठी सौदी अरेबिया, इराक, इराण या ओपेक देशांची बैठक झाली आहे. या बैठकीला रशियाचा प्रतिनिधीदेखील उपस्थित होता. तेलाच्या किमती अशाच पद्धतीनं कमी होत राहिल्यास २०१४-१६ सारखी परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती बैठकीत तेल निर्यातदार देशांनी व्यक्त केली.

## राज ठाकरे उत्तर भारतीयांच्या मंचावर उपस्थित राहणार




**मुंबई** - परप्रांतियांविरोधात नेहमी आक्रमक भूमिका घेणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे हे लवकरच उत्तर भारतीयांच्या मंचावर दिसणार आहेत. राज ठाकरे उत्तर भारतीय महापंचायतीच्या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी ट्विटरवरुन दिली आहे.

येत्या २ डिसेंबर रोजी कांदिवलीतील बुराभाई हॉल येथे उत्तर भारतीय महापंचायतीचा कार्यक्रम होणार आहे. यात प्रमुख वक्ते म्हणून राज ठाकरे उपस्थित राहणार आहेत. ते या कार्यक्रमात उत्तर भारतीयांशी संवाद साधणार आहेत. दि. १२ ऑक्टोबर रोजी ठाकरे यांना उत्तर भारतीय महापंचायतीने कार्यक्रमाचे निमंत्रण दिले होते. त्यावेळी राज यांनी आयोजकांना कोणतेही आश्वासन दिले नव्हते. परंतु, आता संदीप देशपांडे यांनी राज ठाकरेंनी निमंत्रण स्वीकारल्याचे जाहीर केले आहे.

उत्तर भारतीयांविरोधातील नेते अशीच राज ठाकरे यांची देशभरात प्रतिमा आहे. गेल्या काही दिवसांपासून पक्षाची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा निर्णय घेतला असण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. यापूर्वीही राज ठाकरे यांनी जैन, गुजराती समाजाशी संवाद साधला होता. आता ते उत्तर भारतीयांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून आपली भूमिका मांडणार आहेत.

## बँक कर्मचाऱ्यांना लंच टाईम नाहीच - रिझर्व्ह बँक

**मुंबई** : बँकांमध्ये लंचटाईम नाहीच घेता येणार असं आरबीआयने स्पष्ट केलं आहे. सकाळी १० ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत बँकेने लंचब्रेक शिवाय काम करणं अपेक्षित आहे. आरटीयच्या माहितीत आरबीआयनं हे स्पष्ट केलं आहे. उत्तराखंडचे उद्योगपती प्रमोद गोल्डी यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केले होते, त्यावर आरबीआयने उत्तर दिले आहे. लंचच्या नावावर ग्राहकांना तिष्ठत ठेवणं योग्य नाही त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांनी आलटून पालटून जेवण करावं असं आरबीआयने सांगितलं आहे. एका RTI कार्यकर्त्याने बँकांशी संबंधित प्रश्नांची आरबीआयला उत्तरे मागितली होती. या प्रश्नांची आरबीआयने जी माहिती दिली, ती प्रत्येक बँक ग्राहकासाठी फायदेशीर आहे. सकाळी १० वाजेपासून ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत लंच ब्रेकशिवाय सेवा देणे बँकांकडून अपेक्षित आहे. बँक अधिकारी एक-एक करून लंच करू शकतात. यादरम्यान नॉर्मल ट्रान्झॅक्शन सुरू राहिले पाहिजे. बहुतांश पब्लिक सेक्टर बँकांमध्ये लंच टाइमचा बोर्ड लावला जातो. लंचच्या नावावर ग्राहकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागते. परंतु, नियमानुसार असे करता येत नाही. असं आरबीआयने म्हटलं आहे. यावर १ जुलै २०१५ ला आरबीआयने एक सर्क्युलरदेखील जारी केलं होतं. तुम्ही तुमच्या कामासाठी जर बँक बंद केली तर त्याआधी त्याची ग्राहकांना अधिसूचना देणं अनिवार्य आहे.



## पुण्याचं नाव बदलून जिजापूर करा : संभाजी ब्रिगेड


**पुणे** : पुणे शहराचं नाव बदलून जिजापूर करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे. संभाजी ब्रिगेडने यासंदर्भात राज्य सरकारला पत्र पाठवून प्रस्तावावर लवकर पाऊल उचलण्याची मागणी केली आहे. 'औरंगाबादचं नाव संभाजीनगर आणि उस्मानाबादचं नामांतर धाराशीव करण्याच्या शिवसेनेच्या मागणीला आमचा पाठिंबा आहे. आता पुण्याचं नाव बदलून जिजापूर करावं,' अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोष शिंदे यांनी केली आहे.' पुणे शहराला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आईचा अर्थात जिजाऊंचा वसा आणि वारसा आहे. जिजाऊंनी सोन्याचा नांगर फिरवत हे शहर वसवलं. १६३० मध्ये विजापूरच्या



आदिलशाहने पुणे शहराची लूट केली, त्यावेळी भीतीमुळे तिथे कोणीही राहण्यास धजावत नव्हतं. पुणे आता ज्या स्थितीत आहे, ते जिजाऊंच्या योगदानामुळे, ते कोणीही विसरु शकणार नाही,' असं संतोष शिंदे यांनी सांगितलं. 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या आशीर्वादाने हे सरकार स्थापन झालं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगतात. त्यामुळे या प्रस्तावावर कोणीही निषेध करणार नाही, अशी आम्हाला अपेक्षा आहे,' असंही संभाजी ब्रिगेडने म्हटलं आहे.याबाबत आज पुण्याचे जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देणार असल्याचं संतोष शिंदे यांनी सांगितलं. जिल्हाधिकारी आमची मागणी सरकारपर्यंत योग्यारित्या पोहोचवतील अशी आशा असल्याचंही शिंदे म्हणाले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अलाहाबादचं नाव प्रयागराज आणि फैजाबादचं नाव अयोध्या केलं. त्यानंतर उस्मानाबाद, औरंगाबादचं, अहमदाबाद आणि हैदराबादचं नाव बदलण्याची मागणी जोर धरु लागली आहे.


## अयोध्या प्रकरणी तातडीनं सुनावणी नाहीचः सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली:** अयोध्येतील रामजन्मभूमी खटल्यावर तातडीनं सुनावणी घेण्याची मागणी करणारी हिंदू महासभेची याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली आहे. 'न्यायालयानं या प्रकरणी आधीच भूमिका स्पष्ट केली आहे. सुनावणीची तारीखही निश्चित केली आहे,' असं खंडपीठानं याचिका फेटाळताना स्पष्ट केलं.



अखिल भारतीय हिंदू महासभेचे वकील वरुण सिन्हा यांनी या संदर्भातील याचिका केली होती. सरन्यायाधीश रंजन गोगोई व न्या. एस. के. कौल यांच्या खंडपीठापुढं त्यावर सुनावणी झाली. 'अयोध्या प्रकरणाची सुनावणी जानेवारीमध्येच घेतली जाईल. त्याचवेळी सुनावणीची पुढील तारीखही निश्चित केली जाईल. तसा निणऱ्य आम्ही आधीच दिला आहे,' असं खंडपीठानं स्पष्ट केलं.

## सौजन्य व्हॉट्सअप




## सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशनतर्फे अंधेरी साईवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांचा दिवाळी भेटवस्तू देऊन सत्कार





आश्रय ट्रस्ट संलग्न असलेल्या सिनिअर सिटीझन सोशल राईट्स या संस्थेमार्फत अंधेरी परिसरात अनेक वर्षे जेष्ठ नागरिकांना घेऊन विविध कार्यक्रम राबवले जातात. यामध्ये अनेक मान्यवरांनी या संस्थेमार्फत होणाऱ्या कार्यक्रमात सहभाग घेतला आहे. यामध्ये प्रत्येकमहिन्याच्या पहिल्या रविवारी सायंकाळी ५.०० ते ९.०० वाजेपर्यंत अनेक प्रकारचे उपक्रम राबवले जातात. मोठया संख्येने येथे जेष्ठ नागरिक उपस्थित होतात. या कार्य क्रमाचे आयोजन सिनिअर सिटीझन सोशल राईट्स च्या अंधेरी कमिटी अध्यक्ष श्रीमती तुकाबाई चौधर , राष्टीय उपसचिव संतोष चौधर तसेच अनंत दाभोळकर , पंढरीनाथ खंडागळे , जसपाल सिंग रागी, वासुदेव पाष्टे, उल्हास सिरसोळे , दिलीप प्रभु , हरिश्चंद्र रेवाळे , काशीनाथ मांडवकर , दिपकमहाडिक व महादेव पारदले , यांच्या वतीने करण्यात येते. अतिशय गरीब कुटुंबातून आलेल्या जेष्ठ नागरिकांना येथे आपले विचार मांडण्याचा संपूर्ण अधिकार मिळवून दिला जातो.

यावेळी दिवाळीच्या निमित्ताने या महिन्यात जन्मलेल्या जेष्ठ नागरिकांचा सोशल राईट्स चे राष्ट्रीय उपसचिव हेमंत कलिया यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला व सुमारे ३०० जेष्ठ नागरिकांना संदीप सिताराम दळवी यांच्या वतीने साखर , रवा व मैदा यांचे वाटप करण्यात आले. असे अनेक मदतीचे हात पूढे सरसावले आहेत. यावेळी होणाऱ्या कार्य क्रमामध्ये अनेक मान्यवर आपली उपस्थिती देऊन मार्गदर्शन करतात. विशेष म्हणजे पोलिस स्टेशनचे निरीक्षक , महानगर पालिकेचे आयुक्त असे अनेक मान्यवर या कार्यक्रमात सहभाग घेतात. या कार्यक्रमासंबधी संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांनी कमिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

## संपादकीय...



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक


# बरबादीची दोन वर्षे

देशातील तब्बल ८५ टक्के रोख रकमेच्या एक हजार आणि पाचशे रुपयांच्या नोटा कागदाच्या कपट्यात रूपांतरीत करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नोटाबंदीच्या तुघलकी निर्णयाला दोन वर्षे पूर्ण होत असताना त्यावर विचारमंथन आवश्यक आहे. आपण काहीही करू शकतो आणि आपण इतके लोकप्रिय आहोत, की कोणतेही निर्णय जनता स्वीकारेल या नार्सिस्टिक, आत्मप्रेमातून आलेल्या आंधळेपणातून हा अविचार घडला आणि त्याची भुते मात्र अजून देशाच्या आणि विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मानगुटीवरून उतरायला तयार नाहीत. यातील शोकांतिका अशी, की नोटाबंदीसाठी जी कारणे सांगितली गेली त्यापैकी एकही साध्य झाले नाही आणि त्यातून देशाचे आर्थिक कंबरडे मोडले. अनेकांचे प्राण गेले ही बाब निराळीच. त्याचीही शोकांतिका अशी, की त्यात किती लोक मेले आणि त्यांना किती भरपाई दिली ही माहिती अद्याप सरकार उघड करत नाही आणि जनतेने मागूनही ती माहिती दडपली जात आहे. देशाच्या अर्थकरणाला ऐतिहासिक वळण देण्याच्या नावाने घेतलेला हा निर्णय उलटा पडल्याने सरकार तोंडघशी पडले, त्यातून त्यांना अद्याप सावरायला वेळ मिळालेला नाही. या निर्णयामुळे २०१४ साली मरणासन्न झालेला विरोधी पक्ष आता नोटाबंदीच्या निर्णयाचे अमृत पीत पुनरुज्जीवित होत एकत्र येत आहे. दोन वर्षे होऊनही या निर्णयाच्या पारदर्शकतेबाबतचे प्रश्न काही सुटलेले नाहीत. दोन वर्षापूर्वी आठ नोव्हेंबर रोजी नोटाबंदीची घोषणा करताना काळा पैसा बाहेर काढणे, दहशतवादाला पाकिस्तानमधून होणारा अर्थपुरवठा रोखणे, बनावट नोटांचे तण उपटून काढणे असे उद्दिष्ट सांगितले गेले होते. ते साध्य झाले नाही हे कमी अधिक काळात लक्षात आल्यावर डिजिटल क्रांतीचे ढोल भाडोत्री भक्तांच्या माध्यमांतून वाजवले गेले. देशातील रोकड वापर कमी होईल व डिजिटल वापर अधिक वाढून अंतिमत: आर्थिक ध्येयांपैकी भ्रष्टाचाराच्या विरोधात सरकारच्या पारदर्शक कारभाराच्या जाहिराती जनतेच्या पैशांतून करण्यात आल्या. तथापि, तेही खरे नसल्याचे देशातील केंद्रीय बँक, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आकड्यांनी दाखवून दिले. नोटाबंदीच्या निर्णयाला मंजुरी देतानाही बनावट नोटांच्या हेतूला बँकेने आक्षेप घेतला होता, कारण, सुमारे साडेपंधरा लाख कोटी रुपयांत चारशे कोटी रुपये इतके अल्प बनावट नोटांचे प्रमाण असल्याचे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे होते. आता या देशासाठीच्या दुर्दैवी निर्णयाला दोन वर्षे पूर्ण होताना काय साध्य झाले याची रिझर्व्ह बँकेची आकडेवारी पाहिल्यास हसावे की रडावे ते कळत नाही. कारण आता चलनात असलेल्या नोटांचे प्रमाण नोटाबंदीच्या आधीच्या प्रमाणापेक्षाही अधिक वाढले आहे. रोख रकमेचा वापर नोटाबंदीच्या आधी जवळपास १७.७ टक्क्यांनी वाढत होता, त्यानंतरच्या दोन वर्षात ते प्रमाण २२.२ टक्के या दराने वाढले आहे. दरवर्षी भारतात श्रम क्षेत्रात एक कोटी वीस लाख कामगारांची भर पडत असते. म्हणजे बेरोजगारीचा आकडा वाढू द्यायचा नसला, तरी एवढा रोजगार दरवर्षी निर्माण करत राहावा लागतो. नोटाबंदी जाहीर झाली आणि तात्काळ पंधरा लाख रोजगारांवर पाणी पडले. दुसरीकडे, या नोटाबंदीने रोजगाराच्या संधी निर्माण करणाबाबत सोन्याची अंडी ठरणाऱ्या लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांना पांघळे करून टाकले. सत्तेवर येण्याआधी नरेंद्र मोदी यांनी दरवर्षी एक कोटी रोजगार निर्माण करण्याची घोषणा करून आपली 'अच्छे दिन'च्या निवडणूक घोषणेला तेज बहाल केले होते. मात्र प्रत्यक्षात निर्णय उलटेच घेतल्याने त्याच्या परिणामांशी त्यांचा झगडा अजून सुरू आहे. कारण अर्थव्यवस्था अद्याप सुरळीत झालेली नाही, त्यामुळे रोजगाराची स्थितीही पूर्वपदाला आलेली नाही. या निर्णयाच्या संदर्भात महत्वपूर्ण भूमिका होती ती रिझर्व्ह बँकेची. आधीचे गव्हर्नर रघुराम राजन गेल्यानंतर ऊर्जित पटेल यांची नेमणूक झाली होती. ही सरकारची नेमणूक अशा दृष्टीने पाहिले गेले होते आणि ते कायम सरकारची बाजू लढवतील, असे मानले गेले. त्याही आघाडीवर मोदी सरकारचा नवा लढा उभा राहिलेला आहे आणि या दोन वर्षाच्या काळात रिझर्व्ह बँकेशी झालेल्या सरकारच्या संघर्षात पटेल हे कधीही राजीनामा देतील अशी स्थिती आहे. मोदी यांनी नको असताना नवी आघाडी उघडली आणि विरोधकांना एकत्र येऊन आघाडी करण्याचे निमित्त दिले. देशाचे नुकसान झालेच, त्यांनी व्यक्तिगतही नुकसान करून घेतले. आता निवडणुकीचे वातावरण तापत जाईल तसे या नोटाबंदीमुळे जायबंदी झालेल्यांशी त्यांना अधिक जोमाने लढावे लागेल.




जागतिक मधुमेह दिन -१४ नोव्हेंबर २०१८

# भारताच्या आर्थीक विकासाला मधुमेहाचे ग्रहण



## भारतात गेल्या २५ वर्षात १२३ टक्क्यांनी मधुमेह रोगींमध्ये वाढ

*मुंबई : भारताने गेल्या पंचवीस वर्षांत आर्थिक सुधारणा क्षेत्रात नेटाने काम केल्यामुळे दरडोई उत्पन्न तब्बल चार पटीने वाढले आहे. त्याचबरोबर गेल्या दशकात विविध पातळीवर केलेल्या धाडसी प्रयत्नामुळे भारतातील उद्योगसुलभता वेगाने वाढून जागतिक क्रमवारीत भारताचे स्थान मजबूत झाले आहे. आजमितीला भारताने आयटी क्षेत्रामध्ये घेतलेली यशस्वी भरारी, माहिती तंत्रज्ञानामुळे आलेली भौतिक उन्नती यामुळे भारतातील नागरिकांच्या आर्थीक उत्पनात वाढ झाली असून हीच वाढ भारतीयांमध्ये मधुमेह वाढीस कारणीभूत ठरत आहे अशी माहिती इंडियन कौन्सिल फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशनव इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशन तसेच सार्वजनिक आरोग्य फाउंडेशन ऑफ इंडियाच्या २०१७ च्या अहवालामध्ये दिसून आली आहे. या अहवालानुसार १९९० मध्ये जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार भारतातील प्रति व्यक्ति उत्पन्न ३८० डॉलर (२४८६७ रुपये) होती, २०१६ मध्ये ते ३४० टक्क्यांनी वाढून १६७० डॉलर (१,०९००० रुपये) होते. व याच कालावधीत मधुमेहाच्या प्रकरणांची संख्येत १२३ टक्क्यांहून अधिक वाढ झाली.*





आर्थीक सुबत्ता आल्यामुळे शरीराची हालचाल मंदावते व उच्च कॅलरी आहाराच्या अतिसेवनामुळे मधुमेह वाढीस लागतो असा निकष याद्वारे मांडला गेला आहे. याविषयी अधिक माहिती देताना वाशी येथील स्टर्लिंग वोक्हार्ट हॉस्पिटलचे इंटर्नल मेडिसिन तज्ज्ञ डॉ अक्षय छल्लाणी सांगतात, 'गेल्या दशकाचा विचार केला तर मधुमेहामुळे मृत्यू होणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाले असून यात तामीळनाडू पंजाब व कर्नाटक या राज्यांचा पहिला क्रमांक लागतो व ही तिन्ही राज्ये आर्थीक दृष्टया विकसित असून तामिळनाडू येथे १ लाख मृत्यूमागे ५२ मृत्यू हे मधुमेहाने तर पंजाब व कर्नाटकात ४४ व ४२ असे अनुक्रमाने होते व हेच प्रमाण संपूर्ण देशामध्ये २३ आहे म्हणजेच प्रगत राज्यांमध्ये मधुमेह वाढीस लागलेला आहे. आता हे आकडे पाहील्यावर असे वाटेल की मधुमेह हा आजार फक्त श्रीमंतांनाच आहे परंतु हे पूर्णपणे चुकीचे असून मधुमेहामध्ये श्रीमंत व गरीब हा भेदभाव नसून चुकीच्या आहारपद्धती व जीवनशैलीमुळे सर्वच स्तरातील नागरिकांना मधुमेहाची लागण होत आहे. मधुमेह स्त्री-पुरुष, लहान-मोठा, गरीब-श्रीमंत अशा सर्व वर्गीतील लोकांना होतो.'

मधुमेहांचे गांभीर्य समजावून सांगताना बोरीवली येथील अपेक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या मधुमेहविकार तज्ज्ञ डॉ मधुमती कुबेरन म्हणाल्या, 'मधुमेहास सायलेंट किलर या नावाने वैद्यकीय विश्वात संबोधले जाते कारण यात रक्तातील साखर वाढणे एवढेच जरी व्याधीचे स्वरूप दिसत असले, तरी त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. ही रक्तातील वाढलेली शर्करेची पातळी शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर खूप खोलवर परिणाम करते. वाढलेल्या सारखेचे परिणाम पचन संस्था, रक्तवह संस्था, त्वचा, अस्थी, श्वसन संस्था, प्रजनन संस्था, मूत्रवह संस्था, व्याधिशमत्व प्रणाली या सर्वांवर होतो. मधुमेहामुळे अंधुक दिसणे, डोळे दुखणे, जड पडणे अशा दृष्टीशी व डोळ्यांशी निगडित तक्रारी असतात. संधिवात, किडनीवर परिणाम होतो म्हणजेच मधुमेहामुळे कमीत कमी शरीरातील १४ अवयवांवर विपरीत परिणाम होतो.'

जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार भारतामध्ये २०१७ साली अंदाजे ७.२ करोड भारतीयांना मधुमेहाची लागण झाली होती २०२५ पर्यंत हा आकडा दुप्पट म्हणजे १३ करोड होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मधुमेहाविषयी असलेल्या गैरसमजुतीमुळे मधुमेहाचे निदान बरेच वेळा खूप उशिरा होते. चार ते पाच वर्षे निघून गेल्यानंतर डोळा, हृदय, किडनी अशी शरीरातील महत्त्वाची इंद्रिये बरीच खराब झालेली असतात यासाठी मधुमेहाचे उपचार तात्काळ सुरु करणे महत्वाचे आहे अशी माहिती अपेक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या मधुमेहविकार तज्ज्ञ डॉ मधुमती कुबेरन यांनी दिली.

**अधिक माहितीसाठी**
**उमेश भोगले -९८२०३३२५१५**

# दिवाळीच्या सुट्टीत बेकायदा रेती उत्खननात वाढ



दिवाळीनिमित्त शासकीय विभागाला मिळालेल्या पाच दिवसांच्या सलग सुट्टीचा फायदा बेकायदा रेती उत्खनन करणाऱ्यांनी घेतला आहे. शासकीय कर्मचारी सुट्टीवर असल्याने वैतरणा खाडीकिनारी सुरक्षा व्यवस्थेचे तीनतेरा वाजले आणि रेती व्यावसायिकांनी राजरोस रेती उत्खनन सुरू केले आहे. या बेसुमार रेती उत्खननाने वैतरणा रेल्वे पुलाला धोका असून रेल्वे आणि राज्य प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे.

६ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी यांनी जाहीर केलेल्या सुट्टीमुळे पालघर जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना थेट मंगळवारपासून रविवापर्यंत अशी सलग सुट्टी मिळाली आहे. त्यामुळे वैतरणा खाडीकिनारी असलेली सुरक्षा ढिली झाली आहे. त्याचा फायदा बेकायदा रेती उत्खनन करणाऱ्यांनी घेतला आहे. वैतरणा खाडीमध्ये असलेल्या पुलापासून १०० मीटरवर रेती उत्खनन बंदी आहे. अशा परिस्थितीत नदीच्या काठाला आणि पुलापासून अवघ्या पन्नास ते शंभर मीटरनंतरच्या अंतरावर अनेक फायबर बोटींद्वारे नदीचा काठ फोडून त्याखाली असलेला रेतीसाठा गैरमार्गाने खोदण्याचे काम सध्या राजरोस सुरू आहे. शासकीय अधिकारी सुट्टीवर असल्यामुळे या पुलालगत पोलिसांची गस्त असली तरीही आपल्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई होणार नाही हे गृहीत धरून अनेक फायबर बोटींनी या चार-पाच दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणात रेतीउपसा केल्याची माहिती पुढे आली आहे.

वैतरणा पुलाच्या सुरक्षिततेबद्दल अनेकदा प्रश्न चर्चेला आला असून सुरक्षितता राखण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. मात्र सध्या ओळीने आलेल्या दिवाळीच्या सुट्टीचा फायदा घेत, रेती व्यवसायाने गेल्या चार दिवसांमध्ये रेती उत्खनन केले आहे. वैतरणा पुलाखालून नौकानयन तसेच कोणत्याही प्रकारच्या बोटींची वाहतूक बंद केली असली तरी खाडीच्या पश्चिमेच्या बाजूला टेम्भीखोडवे व नारंगी या भागांत रेती उतरवून त्याची वाहतूक विविध शहरांपर्यंत करण्यात येत आहेत. रेती व्यवसायावर सध्या शासनाचे लक्ष असले तरीही शासकीय सुट्टीमुळे आलेल्या मर्यादांचा रेती व्यावसायिक पुरेपूर फायदा घेत दिवाळीच्या संधीचे सोने केले असल्याचे दिसून येत आहे.

# शिधावाटप दुकानात धान्याचा अपहार

ठाकुर्ली-चोळे येथील ग्राहक शिधावाटप दुकानात गेल्यानंतर त्यांना पुरेसे धान्य देण्यात येत नसल्याचे निदर्शनास आल्यावर बुधवारी सकाळी नगरसेविकेसह, ग्राहक महिलांनी शिधावाटप दुकानदाराला घेराव घातला.

शिधावाटप वाटप दुकानात शिधापत्रिकातील कुटुंब सदस्य संख्येप्रमाणे धान्य दिले जात नाही. दोन महिने शिधापत्रिकेवर तूरडाळ दिली जात नाही. ग्राहकांना धान्य खरेदीच्या पावत्या दिल्या जात नाहीत, अशा तक्रारी होत्या. शिधापत्रिकेतील सदस्य संख्येपमाणे पाच किलो गहू देणे अपेक्षित असताना अनेक वेळा धान्य साठा पुरेसा नाही कारण देऊन दोन किलो धान्य ग्राहकांच्या माथी मारले जाते. दोन महिन्यांपासून तूरडाळ वाटप करण्यात आली नाही. शासनाकडून पुरेसा अन्नधान्य साठा दुकानात येत असूनही पुरेसे धान्य हा दुकान चालक ग्राहकांना देत नसल्याचे निदर्शनास आले.



बहुतेक ग्राहक हे चाळ, झोपडपट्टीमधील रहिवासी आहेत. ते दुकानदाराच्या तक्रारी केल्या तर धान्य मिळणार नाही या भीतीने अनेक महिने तक्रार करीत नव्हते. दिवाळी सण आला तरी दुकानदार पुरेसे धान्य देत नाही हे लक्षात आल्यावर महिला ग्राहक जागृत होऊन त्यांनी नगरसेविका प्रमिला चौधरी यांच्याकडे तक्रार केली. धान्य खरेदी केल्यानंतर ग्राहकांना खरेदीची पावती दिली जात नाही. दुकानदार बनावट पावत्या तयार करून धान्याचा अपहार करीत असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे या दुकानदारावर फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि त्याचा परवाना निलंबित करावा, अशी मागणी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

शिधावाटप अधिकारी पोटसुते, निरीक्षक पूजा तांबे शिधावाटप दुकानात दाखल झाल्या. उपस्थित ग्राहक महिलांनी शिधावापट दुकानदार गहू, तांदूळ, साखर देताना करीत असलेल्या अपहाराची माहिती दिली.


# शहरातून पाच मुली अचानक बेपत्ता

**ठाणे** - दिवाळीची सर्वत्र धामधूम सुरू असताना शहरातून पाच किशोरवयीन मुली अचानक बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. मुलींमध्ये दोन सख्या बहिणीदेखील असून या प्रकरणी अपहरणाची तक्रार वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांत दाखल करण्यात आली आहे.

कळव्यातील खारेगाव नाका परिसरात राहणाऱ्या १६ आणि १५ वर्षांच्या दोन सख्या बहिणी बारावी आणि दहावी इयत्तेत शिक्षण घेत आहेत. शुक्रवारी इस्त्री करत असताना साडी जळाली, त्यामुळे या दोघींना आई रागवली. त्यामुळे या मुली घर सोडून निघून गेल्या आहेत. मुली घरी परत येतील, या समजुतीने पालकांनी अधिक लक्ष दिले नाही. परंतु बराच वेळ होऊनही मुली न आल्याने अखेर मुलीच्या वडिलांनी आसपास शोध घेतला. मात्र मुली न सापडल्याने मुलींच्या अपहरणाची तक्रार कळवा पोलिस ठाण्यात केली. सकाळी दहा वाजल्यापासून या मुली बेपत्ता असून पोलिसांकडून शोध सुरू आहे. तर, कळव्यातील शास्त्रीनगरमधून १६ वर्षांची एक मुलगीदेखील गुरुवारी बेपत्ता झाली आहे. ही मुलगी घरात कोणालाच न सांगता निघून गेली असून तिचे नववी इयत्तेपर्यंत शिक्षण झाले आहे. ब्रह्मांडमधूनही १७ वर्षांची मुलगी शुक्रवारी सकाळी घरातून बाहेर पडली. रात्री नऊ वाजले तरी घरी आली नाही. मुलीचे वडील रिक्षाचालक असून भावाने दिलेल्या तक्रारीनंतर कासारवडवली पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आली. वागळे इस्टेटमधूनही १५ वर्षांची एक किशोरवयीन मुलगीदेखील घरातून गायब झाली आहे.

# दिवाळीमध्येच पनवेलमध्ये पाण्याचा ठणठणाट सुरू

**कळंबोली** - एमजेपीच्या पंपाचा बिघाड झाल्याने गेल्या दोन दिवसांपासून नवीन पनवेलमध्येपाणीटंचाई जाणवत आहे. यामुळे दीपावलीच्या सणात रहिवाशांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी तर पिण्यासाठीही पाणी आले नसल्याच्या तक्रारी रहिवाशांनी केल्या आहेत. अशी परिस्थिती सतत निर्माण होत असल्याने या बाबत उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वाहिन्या जुनाट झाल्या आहेत. त्याचबरोबर भोकरपाडा येथील वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. याशिवाय वायाळ येथील पंपातही बिघाड होत असल्याने नवीन पनवेल, कळंबोली आणि पनवेल शहरात पुरेसे पाणी येत नाही. अनियमित स्वरूपाच्या पाणीपुरवठ्याने सिडको आणि महापालिकेच्या तोंडचे पाणी पळवले आहे. मंगळवारी एमजेपीच्या पंपाचा बिघाड झाल्याने रात्रीपासून पाण्याचा दाब कमी झाला. अगोदरच कमी पाणी येते, त्यात ही समस्या निर्माण झाल्याने नवीन पनवेलमध्ये पाणीच आले नाही. या वसाहतीची एकूण मागणी ४२ एमएलडी असताना काल फक्त २७ एमएलडीच पाणी मिळाल्याने पाण्याचे वाटप योग्य पद्धतीने झाले नाही. त्यामुळे सेक्टर-१ ते १९ सेक्टरमध्ये पाणी आलेच नाही. गेल्या तीन दिवसांपासून ही समस्या असल्याचे योगेश शिंदे यांनी सांगितले. त्यामुळे ऐन दिवाळीत नवीन पनवेलकरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागले. एकीकडे महागाई आणि दुसरीकडे कचरा उचलला जात नाही आणि तिसरे म्हणजे पाणीच येत नाही हे कशाचे द्योतक आहे, अशी प्रतिक्रि या पुरुषोत्तम वैष्णव या रहिवाशांनी नोंदवली, या संदर्भात सिडकोच्या नवीन पनवेल कार्यालयात संपर्क साधला असता, एमजेपीकडून पाणी कमी दाबाने येत असल्याचे सांगण्यात आले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## भोंदूबाबावर आरोप सिद्ध

**कल्याण** - पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या भोंदू बाबासह अन्य तिघांना कल्याण सत्र न्यायालयाने दोषी ठरवले आहे. या सर्व आरोपींना १७ नोव्हेंबर रोजी न्यायालय शिक्षा ठोठावणार आहे.

डोंबिवलीतील गांधीनगर परिसरात ७ मे २०१५ रोजी एका भोंदूबाबाने पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केले होते. याप्रकरणी या मुलीने पोलिसात तक्रार केल्यानंतर बालगुन्हेगारी प्रतिबंधक पथकाने या भोंदूबाबाला अटक केली होती. पैशांचा पाऊस पाडून श्रीमंत होण्याची स्वप्ने दाखवत या भोंदूबाबाने जानकी हिंदोळे हिला आमिष दाखवले, मात्र विधीसाठी कुमारिका मुलगी आणण्याची अट त्याने जानकीला घातली. यामुळे ज्या कॅटरर्सकडे जानकी काम करत होती, तिथे काम करणाऱ्या अल्पवयीन तरुणीला तिने हेरले. या तरुणीची सावत्र आई आणि वडिलांना जानकीने पटविले, बाबा पैशांचा पाऊस पडणार असून यातून मिळणाऱ्या एक कोटी रुपयांपैकी काही पैसे देण्याचे आमिष दाखवत या तरुणीला जानकीने बाबाच्या अड्ड्यावर आणले. येथे विधीच्या नावाखाली या बाबाने या तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तरुणीने केला होता. या प्रकरणाची सखोल चौकशी करत पोलिसांनी जानकीलाही अटक केली होती. या प्रकरणाचा खटला कल्याण न्यायालयात सुरू होता. कल्याण जिल्हा सत्र न्यायाधीश एन. एम. वाघमारे यांनी या मुलीचे वडील, आई यांच्यासह जानकी हिंदोळे यांना दोषी ठरविले आहे.

# नवी मुंबई व्हाया जबलपूर सोनं लुटणारी टोळी अटकेत; नवी मुंबई पोलिसांची कारवाई

कळंबोली येथील सायन मार्गावर खाजगी वाहनात बसलेल्या सहप्रवाशाला मारहाण करून त्याच्या डोळ्यात मिरपूड टाकून लुटणाऱ्या आरोपींनी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. जबलपूर येथून पोलिसांनी त्यांना मुद्देमालासह ताब्यात घेतले असून चोरीचे तब्बल १ किलो सोने पोलिसांनी हस्तगत केले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार संतोष मोतीलाल मुरकुंबी (वय ४४, रा. बेळगाव) हे ५ नोव्हेंबर रोजी पनवेलहून बेळगावला एका खाजगी वाहनांतून निघाले होते. कळंबोली येथील सायन पनवेल या मार्गावर रस्त्यावर रात्री पावणे नऊच्या सुमारास अनोळखी सहप्रवाशांनी मुरकुंबी यांना मारहाण केली व त्यांच्या डोळ्यात मिरची पूड घातली आणि त्यांच्या शर्टच्या आतील जॅकेट कापून त्यातील २० सोनसाखळया काढून घेतल्या. या सोनसाखळ्यांचे वजन १ हजार ६९० ग्राम इतके होते. तसेच त्यांच्याजवळील १० हजार रुपयांची रोकड व २ किंमती मोबाईल असा एकूण ५० लाख ७० हजार ६९० रुपये किमतीचा ऐवज या चोरट्यांनी चोरुन नेला होता. सीसीटीव्हीच्या मदतीने पोलिसांनी आरोपींच्या वाहनांचा क्रमांक मिळवून आरोपीचा तपास घेण्याचा प्रयत्न केला. यामध्ये वाहनाचा मालक मध्य प्रदेशातील असल्याचे उघड झाले. या गुन्ह्यातील आरोपींनी अगोदरही अशा प्रकारचे गुन्हे केल्यामुळे त्याची तपशीलवार फोटोसहित माहिती नवी मुंबई पोलिसांकडे होती, या माहितीच्या आधारे त्यांनी आरोपींचा माग सुरु केला होता.

## समुद्रात अमेरिका-चीनच्या युद्धनौकांमध्ये संघर्ष!

# दोन्ही देशात वाढला तणाव



*दक्षिण चीन सागरावरुन चीन आणि अमेरिकेमध्ये सुरु असलेला संघर्ष दिवसेंदिवस अधिक प्रखर होऊ लागला आहे. दक्षिण चीन सागरावरील चीनची वर्चस्ववादाची भूमिका अमेरिकेला अजिबात मान्य नाहीय. त्यामुळे अमेरिकेच्या युद्धनौका नेहमीच या भागात गस्त घालत असतात. सप्टेंबर महिन्यात अशाच एका गस्ती मोहिमेदरम्यान दोन्ही देशांच्या युद्धनौकांमधल्या संघर्षामुळे भीषण परिस्थिती उदभवू शकली असती.*

सप्टेंबरमध्ये दक्षिण चीन सागरात अमेरिकेची विनाशिका दिसल्यानंतर चीनच्या युद्धनौकेने तुम्ही चुकीच्या मार्गावर आहात असा अमेरिकेन विनाशिकेला इशारा दिला. त्यानंतर चीनची युद्धनौका अत्यंत धोकादायक पद्धतीने अमेरिकन विनाशिकेच्या जवळ गेली. त्यामुळे दोन्ही जहाजांमध्ये टक्कर होईल अशी स्थिती निर्माण झाली होती.

अमेरिकन विनाशिका डिकॅटयुरने शिट्टी वाजवून चिनी युद्धनौकेला सावध करण्याचा प्रयत्न केला पण चीनच्या युद्धनौकेने त्याची अजिबात दखल घेतली नाही. ते वेगाने अमेरिकन विनाशिकेच्या दिशेने गेले. ते आम्हाला मार्गातून हटवण्याचा प्रयत्न करत होते असे एका अमेरिकन खलाशाने सांगितले.

डिकॅटयुर विनाशिका उजव्या बाजूला वळल्याने सुदैवाने ही धडक टळली. सप्टेंबर महिन्यात हा संघर्ष झाला. जर ही धडक झाली असती तर जहाजाच्या नुकसानीबरोबर दोन्ही बाजूला प्राणहानी झाली असती. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा तणाव निर्माण होऊ शकला असता असे नाव न छापण्याच्या अटीवर एका वरिष्ठ अमेरिकन अधिकाऱ्याने सांगितले. दक्षिण चीन सागरातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर डोळा ठेऊन चीनने तिथे अनेक कृत्रिम बेटे तयार केली आहेत. चीनचा अनेक शेजारी देशांबरोबर दक्षिण चीन सागराच्या मालकीवरुन मोठा वाद सुरु आहे. अमेरिकेला चीनची ही दादगिरी अजिबात मान्य नाहीय. त्यामुळे अमेरिकन नौदलही या भागात मोठ्या प्रमाणावर सक्रिय आहे.

# आता निवडणूक नाही : शरद पवार



पुण्यात शिक्षण घेताना विविध महाविद्यालयीन निवडणुका पवार पॅनेलच्या माध्यमातून लढवल्या आणि जिंकल्याही. या निवडणुकीमध्ये विशेषत ग्रामीण भागातील विद्यार्थी असायचे. तेव्हापासून आजपर्यंत संघटन करण्याचे काम केले. आज राजकारणातील कारकिर्दीला ५२ वर्षे पूर्ण होत असून पुण्याच्या त्या निवडणुका हाच त्याचा पाया आहे. अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार पुणे शहराविषयीच्या जुन्या आठवणींना सुधीर गाडगीळ यांनी घेतलेल्या मुलाखती दरम्यान उजाळा दिला. या मुलाखतीत आता पुण्याचे नेतृत्व करायला आवडेल का?, असा प्रश्न सुधीर गाडगीळ यांनी केला असता. त्यावर आता निवडणूक नाही असे सांगत पवारांनी उत्तर देणे टाळले.

जुन्या पुणे शहराच्या छायाचित्रांचे कॉफीटेबल बुक 'पुणे एकेकाळी 'आणि स्मरणरम्य दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी केंद्रीय मंत्री शरद पवार आणि सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'आठवणीतले पुणे' या विषयावर सुधीर गाडगीळ यानी शरद पवार आणि श्रीनिवास पाटील यांची प्रकट मुलाखत घेतली. यावेळी या दोन्ही नेत्यांनी महा विद्यालयीन जीवनापासून आज अखेर पर्यंतच्या पुणे शहरातील अनेक आठवणींना उजाळा देखील दिला. तर यावेळी लेखक मंदार लवाटे, पेपरलीफचे संस्थापक जतन भाटवडेकर उपस्थित होते.


पानशेत धरण फुटल्यानंतरची एक आठवण सांगताना शरद पवार म्हणाले की, 'पानशेत धरण फुटल्यानंतर शहराचे मोठ्या प्रमाणवर नुकसान होते. महाविद्यालयात असताना. आम्हाला फिझिकल एज्युकेशनचे सर होते. त्यांचे घर पाण्यामध्ये वाहून गेले होते. ते अतिशय दुःखी होते. रडत बसले होते. सर सर्व ठीक होईल. असे आम्ही त्यांना सांगत होतो. त्यावर ते म्हणाले जर्मनी ऑलिम्पिक मध्ये मिळवलेले पदक वाहून गेले आहे. त्याचे मला फार दुःख आहे. त्यांच्या या वाक्यातून देश आणि खेळावर असलेली निष्ठ दिसते.'

तुम्हाला पुण्यात कोणते पदार्थ खाण्यास आवडत त्यावर श्रीनिवास पाटील म्हणाले, 'एस.पी समोर जीवनामध्ये चहा बटाटेवडा, भेळ आणि पदार्थ. तेवढ्यात शरद पवार म्हणाले, 'पाटील कासमचा खिमा विसरलात का?' असे म्हणताच सभागृहात एकच हशा पिकला. 'आम्ही गावाकडून शहरात शिकण्यास आलो. पुण्यात अनेक ठिकाणी फिरलो. त्यावेळी काही हॉटेल मध्ये जेवणासाठी नेहमी जायचो. घरून महिन्याच्या खर्चासाठी पैसे दिले जायचे. त्यामध्ये शरद राव, मी आणि धनाजी आमच्या तिघा मित्राचा खर्च लिहिला असायचा तो खर्च घरी देत असत. आज ही त्यावेळीची वही जपून ठेवली आहे, अशा आठवणी श्रीनिवास पाटील यानी सांगितल्या.'

# छत्तीसगड सहा स्फोटांनी हादरले

## नक्षलवाद्यांचा हल्ला

**छत्तीसगड:** छत्तीसगड निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला फक्त एक दिवस उरला असताना कांकेर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांवर हल्ला केला. या हल्ल्यात एकामागोमाग एक असे ६ बॉम्बस्फोट नक्षलवाद्यांनी केल्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ माजली आहे.



छत्तीसगडमधील निवडणुकांना नक्षलवाद्यांचा प्रचंड विरोध होतो आहे. निवडणुकांदरम्यान नक्षलवादी घातपात घडवण्याचीही शक्यता आहे. यामुळे सुरक्षा यंत्रणा चोख ठेवण्यात आली आहे. बीएसएफचं एक पथक आज सकाळी रेकी करण्यासाठी गेलं असताना नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. आयईडी तंत्राचा वापर करून एकामागोमाग एक बॉम्बस्फोट घडवून आणले. या हल्ल्यात अनेक सुरक्षाकर्मी जखमी झाल्याचे प्राथमिक वृत्त मिळते आहेत. नक्षलवाद्यांनी काही दिवसापूर्वी दुरदर्शनच्या एका कॅमेरामॅनचीही हत्या केली होती. त्यानंतर रोजच नक्षलवादी आणि जवानांमध्ये राज्यभर चकमक होते आहे. बीजापूर परिसरातही काल एक जवान ठार झाल्याची घटना ताजी आहे.

गेल्या आठवड्यात सुरक्षा दलांनी तब्बल ३०० आयईडी बॉम्ब जप्त केले आहे, छत्तीसगडची निवडणूक सुरळीतपणे पार पाडणे हे लष्करासमोरचं आव्हान आहे.

# तरुणांमध्ये दम मारो दम, ई-हुक्का प्यायची वाढतेय क्रेझ

**कल्याणीनगर :** राज्य शासनामुळे हुक्कावर बंदी आणली आहे. यामुळे आता खासगी हुक्का पार्ट्यांचे प्रमाणत वाढले आहे. या प्रमाणेच युवकांमध्ये (इलेक्ट्रॉनिक) ई-हुक्क्याव्दारे दम मारण्याचे प्रमाण वाढले आहे. ऑनलाईन आणि पानटपऱ्यांवर तीनशे ते तेरा हजार रुपयांमध्ये ई हुक्का विक्री होते. पेनसारखी दिसणारी ही वस्तू हुक्का आहे, हे पटकन लक्षात येत नाही. यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि युवक ई हुक्क्याचा वापर सार्वजनिक आणि खासगी ठिकाणी सर्रास करू लागले आहेत.



टेरेस रेस्टॉरंट, मंद प्रकाश आणि मोठ्या आवाजातील डीजे संगीतासोबत हुक्का हे चित्र शहरातील अनेक भागामध्ये होते. वेगवगेळ्या इव्हेंटला हुक्का पार्टीचे आयोजन हॉटेल व्यावसायिक करत होते. हुक्का पिणे हे स्टाईल आणि प्रतिष्ठेचे मानले जात होते. यामुळे हुक्का पार्लरमध्ये मोठ्या प्रमाणात शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी आणि आयटीतील तरूण हक्का ओढत असायचे. अनेकांना हुक्क्याचे व्यसन जडले होते. हुक्क्याच्या व्यसनामुळे युवकांचे आरोग्य खराब होऊ नये यासाठी राज्य शासनाने हुक्काबंदी लागू केली. शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील हुक्का पार्लर बंद झाले आहेत. मात्र, पूर्णत: हुक्क्यावर बंदी आली नाही. हुक्काप्रेमी गुपचूप हुक्का पार्ट्यांचे आयोजन करू लागले आहेत. ऑनलाईन संकेतस्थळावर तसेच पानटपरीवर सहज हुक्क्याचे साहित्य आणि फ्लेवर मिळत आहे. हुक्क्याचे साहित्य घेऊन घरांमध्ये, खासगी जागेत किंवा फार्म हाऊसवर हुक्का पार्टी रंगू लागली आहे. विद्यार्थी पैसे जमा करून पेन ड्राईवसारखा दिसणारा ई हुक्का विकत घेतात. त्यामध्ये फ्लेवर भरून गुपचूप हुक्का ओढतात. पेन ड्राईव आणि पेन सारखा ई हुक्का दिसतो. ई हुक्का लवकर ओळखता येत नाही. त्यामुळे अनेकदा विद्यार्थी कम्पासपेटी किंवा दप्तरामध्ये ई हुक्का सरार्स ठेवतात. पालकांना या हुक्क्याबाबत कळत नाही. एकदा ई हुक्का चार्ज केल्यानंतर तीन ते चार दिवस चालतो. या ई हुक्क्याची क्रेझ विद्यार्थ्यांमध्ये वाढत आहे. राज्यात हुक्क्यावर बंदी असतानाही विद्यार्थी सहजरीत्या हुक्क्याचे व्यसन करू लागले आहेत.

हुक्का सिगरेटपेक्षा जास्त धोकादायक. एक हुक्क्याचे फ्लेवर साधारण ८० मिनिट चालते. जवळपास हजार सिगरेट पिण्यासारख आहे. हुक्क्यातून कार्सिनोजन बाहेर पडते. ज्यामुळे हृदयविकार, फुफ्फुसाचा कॅन्सर यासारखे आजार होतात. हुक्काच्या ॲपल स्ट्रॉबेरी किवी मिक्स फ्रूटसारख्या फ्लेवरमध्ये फळाचा सिरप नावाला टाकला जातो. या फ्लेवरमध्ये जास्त प्रमाणात निकोटिनयुक्त तंबाखू असते.

# राजकीय वादातून दोन गटात तुंबळ हाणामारी, ८ जण गंभीर जखमी

**कोल्हापूर:** कोल्हापुरातील गेळवडे गावात दोन गटांत पूर्ववैमन्यातून प्रचंड हाणामारी झाली. पाच ते सहा जणांच्या टोळीने तलवारी आणि काठ्यांनी केलेल्या हल्ल्यात आठजण गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यात एकाचा उजवा हात कोपरापासून तोडण्यात आला आहे. त्यामुळे या गावात तणाव निर्माण झाला आहे. याप्रकरणी शाहुवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

जून २०१८ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीतील सरपंच निवडीवरून दोन गटात वाद धुमसत होता. त्यामुळेच ही हाणामारी झाल्याचं सूत्रांनी सांगितलं. गेळवडेतील सीताराम सखाराम लाड (वय ३३) व सुभाष शिवाजी पाटील (३०) हे दोघे रविवारी सकाळी ट्रॅव्हल्सने मुंबईहून मलकापूर येथे आले होते. हे दोघेही वडापने गेळवडे गावात पोहोतचात



पाच ते सहा जणांनी काठ्या आणि तलवारींसह त्यांच्यावर हल्ला केला. अचानक झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यात सीताराम लाड याचा उजवा हात कोपरापासून तुटला आहे. या हल्ल्यात सुभाष पाटील, रुक्मिणी लाड यांच्यासह दुसऱ्या गटातील बाळकू पाटील, आनंदा पाटील, शरद पाटील, शिवाजी पाटील, तानाजी पाटील हे जखमी झाले आहेत. सुभाष पाटील हा देखील या हल्ल्यात जखमी झाला आहे. बाळकू हरी पाटील, आनंदा हरी पाटील, शरद हरी पाटील यांच्यासह अन्य तिघांनी हा हल्ला केल्याचं सूत्रांनी सांगितलं.

# 'नोटाबंदी, जीएसटीमुळेच आर्थिक वेग मंदावला'

**वॉशिंग्टन** - रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून मोदी सरकारच्या नोटाबंदी व जीएसटी अंमलबाजवणीच्या निर्णयाला चुकीचे ठरवले. 'जगभरातील अर्थव्यवस्था भरारी घेत असताना, याच दोन धक्क्यांमुळे भारतातील आर्थिक विकासाचा वेग मंदावला', असे टीकात्मक विश्.षण त्यांनी केले.

अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठातील व्याख्यानात राजन यांनी '२५ वर्षांपासून ७ टक्के विकास दर कायम ठेवणे ही खूपच मजबूत स्थिती आहे', असे नमूद करतानाच, 'पूर्वी साडेतीन टक्क्यांपर्यंत असलेला हा वेग आता मजबूत स्थितीत पोहोचला असला तरी, काही अंशी हा 'हिंदू विकास दर' ठरला

आहे. पण तो पुरेसा नाही. त्याहून अधिक विकास दर गाठण्याची भारताची क्षमता आहे. पुढील किमान १० ते १५ वर्षे भारताने हा दर कायम ठेवायला हवा. देशात दरमहा दहा लाख नव्या नोकऱ्यांची निर्मिती होणे गरजेची आहे', अशी आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.



'भारतीय अर्थव्यवस्थेसमोर तीन प्रमुख समस्या आहेत. बँकांचे 'शुद्धिकरण', तोकड्या पायाभूत सुविधा, ऊर्जा प्रकल्पांचा तुटवडा', असेही राजन यांनी स्पष्ट केले.

# रथयात्रा रोखणाऱ्यांना रथाखाली चिरडू

**भाजपाच्या पश्चिम बंगालच्या एका महिला नेत्याने वादग्रस्त वक्तव्य केले आहे. जे लोक पश्चिम बंगालमधील नियोजित रथयात्रा रोखण्याचा प्रयत्न करतील त्यांना रथाच्या चाकाखाली चिरडून टाकू अशी धमकीच राज्य महिला मोर्चाच्या अध्यक्ष लॉकेट चॅटर्जी यांनी दिली आहे. ही रथयात्रा राज्यात लोकशाही स्थापन करण्याच्या उद्देशाने आयोजित केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. मालदा जिल्ह्यात माध्यमांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.**



दरम्यान, भाजपा अध्यक्ष अमित शाह हे या तीन रथयात्रांची सुरुवात करणार आहेत. राज्यातील सर्व ४२ लोकसभा मतदारसंघात जाणारी ही रथयात्रा ५, ७ आणि ९ डिसेंबरला निघेल. यात्रेच्या समाप्तीनंतर पक्षाची कोलकाता येथे एक सभा होणार असून त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी मार्गदर्शन करण्याची शक्यता आहे.

चॅटर्जी म्हणाल्या, रथ यात्रेचा मुख्य उद्देश हा पश्चिम बंगालमध्ये लोकशाही बहाल करणे. आम्ही यापूर्वीही म्हटले आहे की, रथ यात्रा रोखणाऱ्यांचे शिर रथाच्या चाकाखाली चिरडून काढू.

चॅटर्जी यांच्या वक्तव्याचा सत्तारुढ तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस पार्थ चॅटर्जी यांनी निषेध केला आहे. भाजपा नेते प्रक्षोभक वक्तव्ये करत राज्यातील शांतता आणि स्थिरता भंग करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. बंगालमध्ये आपले धार्मिक धोरण पुढे रेटण्याचा भाजपाचा मुख्य उद्देश आहे. परंतु, बंगालमधील लोक भाजपाचे फुटीरवादी राजकारण यशस्वी होऊ देणार नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# दिवाळीनंतर मोठा झटका; गॅस सिलिंडर २ रुपयांनी महागला



**नवी दिल्ली** - केंद्र सरकारने एलपीजी वितरकांच्या कमिशनमध्ये वाढ करण्यासाठी गॅस सिलिंडरची दरवाढ सर्वसामान्य ग्राहकांच्या खिश्यातून वसूल करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा झटका देत अनुदानित एलपीजी गॅस सिलिंडर आज दोन रुपयांनी महागला. या दरवाढीनंतर १४.२ किलोच्या एलपीजी सिलिंडरची किंमत मुंबईत ५०५.०५ रुपये झाली आहे. गेल्या महिनाभरात दुसऱ्यांदा ही दरवाढ झाली आहे. जूनपासून एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत दर महिन्याला वाढ होत आहे. जीएसटी आणि एकूण किंमतीत १६.२१ रुपयांची वाढ ही यामागची कारणं सांगून सरकारने दरवाढ केली होती. त्याचप्रमाणे गेल्या महिनाभरात आज केलेली दरवाढ ही दुसऱ्यांदा केलेली दरवाढ आहे. वितरकांचे कमिशन १४.२ किलोच्या सिलिंडरसाठी ४८.९८ रुपये आणि ५ किलोच्या सिलिंडरसाठी २४.२० रुपये होते.

# लक्ष्मीपूजन ते भाऊबीज या कालावधीत नाशकात चोरट्यांची दिवाळी

**नाशिक :** लक्ष्मीपूजन ते भाऊबीज या कालावधीत चोरट्यांनी शहरातील पाच ठिकाणी हात सफाई करून तब्बल १६ लाख दहा हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. यापैकी गंगापूररोड परिसरातील एकाच घरातून १३ लाख ५० हजार रुपयांची रोकड चोरून नेली, तर इतर ठिकाणच्या चोऱ्यांमध्ये सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गंगापूररोडवरील जेहान सर्कलजवळ एका घराच्या उघड्या दरवाजातून प्रवेश करून चोरट्यांनी तब्बल साडेतेरा लाखांची रोकड चोरून नेली. माला ठक्कर (रा. ३०२/ अ, रुषिराज) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ३० ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटात ठेवलेल्या बॅगेत ठेवलेली रोकड चोरून नेली. त्यामध्ये ५०० रुपयांच्या २ हजार ३०० नोटा, २००० रुपयांच्या



१०० नोटा होत्या. तानाजी पेखळे (रा. स्वामी पार्क सोसायटी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ७ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत चोरट्यांनी आकडीच्या साहयाने सोन्याची साखळी,सोन्याचे पॅण्डल असे ३ तोळे ९ ग्रॅम वजनाचे दागिने चोरून नेले.

# रोहिदास पाटील मेनेजमेंटचे विद्यार्थी ज्येष्ठांच्या व अनाथांच्या दारी

**भाईदर (प्रतिनिधी) :** श्री शंकर नारायण एजुकेशन ट्रस्ट, भाईदर ही संस्था गेली २५ वर्षे भाईदरमध्ये उच्च शिक्षणाचे विधायक कार्य करीत आहे. सामाजिक कार्याचा वसा ह्या संस्थेने जोपासला आहे. दिवाळीच्या निमित्ताने या संस्थेच्या रोहिदास पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मेनेजमेंट स्टडीजच्या विद्यार्थ्यांनी स्वतः रंगविलेले दिव्यांचे वाटप किशन गोपाल राजपुरीया वृद्धाश्रम, गोराई व आमचा घर, उत्तन येथील अनाथ - अनाश्रीत निराधार



मुलींच्या पुनर्वसन केंद्रात केले तसेच आदिवासी पाडा (पारोळ) वज्रेश्वरी येथीलही आश्रमातील मुलांना कपडे व दिव्यांचे वाटप करून आनंद दिगुणीत केला. समाजापासून वंचित व उपेक्षित जेष्ठांना व निराधार मुलीना फारच मोठा दिलासा दिला.

जे का रंजले गांजले त्यासी, म्हणे जो आपले.... या तुकाराम महाराजांच्या अभंगाची प्रचीती दिली. आपुलकी, प्रेम, वात्सल्याच्या भावनेने वृध्द व अनाथ मुली भारावून गेल्या. समाजात अद्याप माणुसकीचा ओलावा, आत्मीयता टिकून आहे याची प्रचीती विद्यार्थी, प्राध्यापकांनी दिली. विद्यार्थी, प्राध्यापकांच्या या अनोख्या व अभिनव उपक्रमाने जेष्ठांनी व अनाथ मुलीनी कृतज्ञता व कृतार्थता व्यक्त केली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक व स्वागत होत आहे. या उपक्रमाचे प्रणेते आणि प्रेरणास्थान संस्थेचे अध्यक्ष रोहिदास पाटील यांच्या मार्गदर्शनाने झाले.

**आरोग्य, आर्थिक, प्रापंचिक, शिक्षण, विवाह, प्रेमप्रकरण, नोकरी, व्यवसाय, आजार, परदेशगमन, कोर्टकचेरी या अशा अनेक विषयांनी माणसांचे जीवन ग्रासलेले आहे. यासाठी आमची संस्था 'मानवसेवा हीच खरी ईश्वर सेवा' समजून मागील २४ वर्षांपासून अंकगणित (नुमेरॉलॉजिस्ट), ज्योतिष व वास्तुशास्त्रानुसार योग्य मार्गदर्शन करीत आहे याचा फायदा अनेकांना झाला आहे तरी ज्यांना वरील मार्गदर्शन हवे असल्यास संपर्क करावा.**

- स्वताःचे भविष्य स्वताः जाणून घेण्याची व शिकविण्याची नवीन संधी.
- समस्या नाहीत असे जीवन नाही, उपाय नाहीत अशी समस्या नाही.
- अंकशास्त्र स्वतः शिकून इतरांना मार्गदर्शन करू शकता.

**'सकारात्मक विचार व आत्मविश्वास हवा असेल तर फक्त एक कॉल तुमचा दिलासा आमचा'**

अमरनाथ परब - (अंक ज्योतिषी व समुपदेशन) संपर्क : ९९२०८७२२४८/ ७०२१८९४२८४




# आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

**आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.**

**संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८**

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)